# पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
# पोलीस भरती - २०१७

ई-मेल व्दारे
प्रति,

व्यवस्थापक,
महा ऑनलाईन कंपनी मर्यादित, मुंबई.

क्रमांक आस्था-३(१)/पो.भ.-२०१७/लेखी परीक्षा/२०१७, पुणे, दिनांक २८/०४/२०१७.

संदर्भ :- अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म.रा.मुंबई यांचेकडील क्र. अपोमसं/पो.शि.भरती/सन २०१७/१३३३/२०१६/१५४१, दि. ३१/०३/२०१७.

विषय :- सन २०१७ ची पो.शि.पदाच्या भरती प्रक्रिये बाबत . . .
लेखी परीक्षेचे प्रवेश पत्रा बाबत.

---००---

उपरोक्त नमूद संदर्भ व विषयान्वये पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर या आस्थापनेवरील पोलीस शिपाई भरती २०१७ मध्ये लेखी परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी सोबत जोडली आहे.

पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा रविवार, दिनांक ३०/०४/२०१७ रोजी शिवाजीनगर पोलीस मुख्यालय येथील कवायत मैदानावर सकाळी ०७.०० वा. घेण्याचे नियोजित केले आहे. त्यासाठी उमेदवारांना सकाळी ०५.३० वाजता परीक्षेच्या ठिकाणी हजर राहाण्याबाबत कळविण्यांत यावे. तसेच सदरच्या परीक्षे करीता उमेदवारांना पॅड व काळे बॉलपेन या कार्यालयाकडून पुरविण्यांत येणार आहेत.

दिनांक ३०/०४/२०१७ रोजी होणा-या लेखी परीक्षेची बैठक व्यवस्था पाहाण्यासाठी व त्या संदर्भात देण्यात येणा-या सुचनांसाठी पात्र उमेदवारांनी दिनांक २९/०४/२०१७ रोजी सकाळी ०८.०० ते १४.०० वाजे या कालावधीत शिवाजीनगर पोलीस मुख्यालय कवायत मैदानावर उपस्थित राहाण्याबाबत सुचीत करण्यांत यावे ही विनंती.

( शेषराव सुर्यवंशी )
सदस्य, पोलीस भरती समिती तथा
पोलीस उप आयुक्त,मुख्यालय-२,पुणे शहर.

प्रत सादर :- अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
२/- सोबत जोडलेल्या लेखी परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी व सुचना पोलीस महासंचालक कार्यालयाच्या संकेतस्थळावर कृपया प्रसिध्द करण्यांस विनंती आहे.

प्रत :- पोलीस निरिक्षक संगणक कक्ष, पुणे शहर
२/- सोबत जोडलेल्या लेखी परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी व सुचना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत यावी.

E:\POLICE RECRUITMENT-2017\NOTTING-PB-17 - II.DOCX

# पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
# पोलीस भरती - २०१७

जा.क्र. आस्था-३(१)पो.भ.-२०१७/लेखी परिक्षा/२०१७, पुणे, दिनांक :२८/०४/२०१७

## लेखी परीक्षेसाठी उमेदवारांना सुचना

१) पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा रविवार, **दिनांक ३०/०४/२०१७ रोजी सकाळी ०७.०० वा शिवाजीनगर पोलीस मुख्यालय येथील कवायत मैदानावर** घेण्यात येणार आहे. संबंधीत उमेदवारांनी **सकाळी ०५.३० वाजता परीक्षेच्या ठिकाणी उपस्थित** राहावे.

२) लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना महापोलीस महाऑनलाईन यांचेकडून प्रवेशपत्र देण्यांत येणार आहे. संबंधीत उमेदवारांनी सदरचे प्रवेशपत्र डाऊनलोड करुन, त्याची प्रत सोबत आणावी.

३) लेखी परीक्षेची बैठक व्यवस्था व त्या संदर्भातील देण्यात येणा-या सुचनांकरीता संबंधीत उमेदवारांनी **दिनांक २९/०४/२०१७ रोजी सकाळी ०८.०० ते १४.०० वाजे पर्यन्त** त्यांना **या कार्यालयाकडून मैदानी चाचणीच्या वेळी देण्यांत आलेले ओळखपत्र, कापडी चेस्ट नंबर व महाऑनलाईन कडुन देण्यांत येणा-या ओळखपत्रासह शिवाजीनगर पोलीस मुख्यालय कवायत मैदानावर** समक्ष उपस्थित राहावे.

४) लेखी परीक्षेसाठी उमेदवारांनी आपली ओळख पटविण्याकरीता च**फोटो आय.डी. म्हणून मुळ (ओरीजनल) आधारकार्ड, पॅन कार्ड, निवडणुक ओळखपत्र, मोटार वाहन परवाना** इत्यादी सोबत आणणे आवश्यक आहे.

५) सदरच्या परीक्षे करीता उमेदवारांना **पॅड व काळे बॉलपेन** या कार्यालयाकडून पुरविण्यांत येणार आहेत.

६) लेखी परीक्षेसाठी येतांना उमेदवारांनी **मोबाईल, कॅलक्युलेटर, डिजीटल वॉच या सारखी इलेक्ट्रीक** साधणे सोबत आणु नये.

७) उमेदवारांनी लेखी परीक्षे दरम्यान गैरप्रकार, गैरवर्तन केल्याचे निदर्शनास आल्यास, संबंधीत उमेदवारां विरुध्द कायदेशीर कारवाई करुन, त्यांना भरती प्रक्रियेतुन बाद करण्यांत येईल याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

ठिकाण :- पुणे
दिनांक :- २८/०४/२०१७.

( शेषराव सुर्यवंशी )
सदस्य, पोलीस भरती समिती तथा
पोलीस उप आयुक्त,मुख्यालय-२,पुणे शहर.

प्रति,

संपादक, दैनिक. . . . . . . . . . .

२/- कृपया सदरची जाहिरात आपल्या दैनिकात जनहितार्थ मोफत प्रसिध्द करण्यांत यावी ही विनंती.

E:\POLICE RECRUITMENT-2017\NOTTING-PB-17 - II.DOCX